महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
www.nagpureduboard.in
e-mail:- msboardnagpur@gmail.com

पत्र क्र.नाविमं / प.उ.मा. / 3693
नागपूर,दि. 20 / 11 / 2023

प्रति,
मा.संचालक ,
माहीती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषयः– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु/मार्च–2024 परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास मुदतवाढ देणे व चलन Download करुन बॅंकेत शुल्क भरण्याच्या तारखांबाबत.

संदर्भ : –1) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र/परीक्षा–3/4879 दिनांक – 02/11/2023
2) राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र/परीक्षा–3/4880 दिनांक – 02/11/2023

महोद्‌य,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्र/मार्च– 2024 मध्ये घेण्यात येणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12 वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरण्याच्या तारखाना मुदतवाढ देणे व चलन Download करुन बॅंकेत शुल्क भरण्याच्या तारखांबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपण आपल्या कार्यकक्षेतील सर्व वृत्तपत्रातुन तात्काळ, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

सोबतः– राज्य मंडळ प्रकटनाची प्रत

(चितांमण वंजारी )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

O/c
20/11/23
20·11·2023

प्रतिलिपीः–
1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2)शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3)शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.
4)मा. संपादक, दैनिकभास्कर, सकाळ, महाराष्ट्रटाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, लोकमतसमाचार, तरुण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

१. खालील तपशीलाप्रमाणे विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क खाली नमूद केलेल्या बँकेमध्ये **RTGS/NEFT** द्वारे भरणा करुन चलनाची प्रत, विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट दिलेल्या तारखेस विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात –

| | | |
|---|---|---|
| १. पुणे, छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर | :– | **Bank of India Virtual Account** |
| २. मुंबई, नागपूर व लातूर | :– | **HDFC Bank Virtual Account** |
| ३. अमरावती, नाशिक व कोकण | :– | **AXIS Bank Virtual Account** |

२. आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकिय चलन **Download** करुन चलनावरील **Virtual Account** मध्ये **NEFT/RTGS** द्वारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **NEFT/RTGS** द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच **Account Number** व **IFSC Code** चूकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

३. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत.

४. **विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.**

५. **अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.**

दिनांक – २०/११/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ४.

प्रति,

पत्र क.नाविमं / प.उ.मा. / 3693
नागपूर,दि 20 / 11 / 2023

मुख्याध्यापक / प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग, नागपुर
(भंडारा,चंद्रपुर,नागपुर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया.)

नागपुर विभागीय मंडळाचे कार्यकक्षेतील सर्व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयानी आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास मुदतवाढ देणे व चलन Download करुन बॅकेत शुल्क भरण्याच्या तारखांबाबतच्या उपरोक्त प्रकटनाची नोंद घ्यावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

F:\HSC.docx20

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ॥ प्रकटन ॥

विषय :— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी — मार्च २०२४ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या विलंब शुल्काच्या तारखांबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु—मार्च २०२४ परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थी, व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer Of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर नियमित शुल्काने ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याची मुदत दिनांक २०/११/२०२३ रोजी समाप्त होत असून विलंब शुल्काच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे —

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत शास्त्र, कला, व वाणिज्य शाखांचे नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATABASE वरुन ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याच्या तारखा तसेच व्यवसाय अभ्यासक्रम (HSC Vocational Stream) शाखांचे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer Of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखा. | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन काढून बँकेत शुल्क भरण्याच्या तारखा |
|---|---|---|
| विलंब शुल्क | मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२३<br>ते<br>मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२३ | शनिवार, दि. २५ नोव्हेंबर २०२३<br>ते<br>गुरुवार, दि. ३० नोव्हेंबर २०२३ |

अ) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGS/NEFT द्वारे भरणा केल्याच्या पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करण्याची तारीख मंगळवार, दिनांक ०५/१२/२०२३ अशी राहील.

ब) सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमिट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करुन अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी. त्यानंतर सदर प्रिलिस्ट परीक्षा फी चलन व विद्यार्थी यादी सोबत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

इ. १२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ विद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे —